महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र : संकिर्ण -२०१८/प्र.क्र.७२ / परिचर्या
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
(७ वा मजला),लो. टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १० एप्रिल, २०१८

प्रति,
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय :- निरंतर परिचर्या कार्यशाळेस (Continuous Nursing Education) स्थगिती देणेबाबत..

महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचेकडून खाजगी व शासकीय रुग्णालयात कार्यरत परिचर्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी आयोजित करण्यात येत असलेल्या “सीएनई (निरंतर परिचर कार्यशाळा)” प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहणा-या परिचर्या /कर्मचारी यांचेकडून मोठया प्रमाणात प्रशिक्षण शुल्क आकारुन आर्थिक लुट होत असल्याबाबतच्या लेखी व तोंडी तक्रारी शासनास प्राप्त होत आहेत. तसेच या संदर्भात काही वर्तमानपत्रात बातम्याही छापून आलेल्या आहेत.

२. उपरोक्त वस्तुस्थिती तसेच सीएनई प्रशिक्षण घेणेबाबतची कोणतीही तरतूद महाराष्ट्र परिचर्या अधिनियम १९६६ मध्ये नाही, या बाबी लक्षात घेता शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरहू निरंतर परिचर्या कार्यशाळेस (Continuous Nursing Education) स्थगिती देण्यात येत आहे.

३. सदर स्थगिती आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१५३२४९५७१३ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

MAHAJAN
HEMANT
ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Medical Education and Drug Department,
postalCode=400001, st=Maharashtra,
2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1,
serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa,
cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.04.10 15:58:32 +05'30'

(हेमंत महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- १) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) अवर सचिव (सेवा-५),सार्वजनिक आरोग्य विभाग,गो.ते.रुग्णालय आवार,नविन मंत्रालय,१० वा मजला,लो.टी.मार्ग,मुंबई-४०० ००१
३) प्रबंधक,महाराष्ट्र परिचर्या परिषद,५ वा मजला, बॉम्बे म्युचुअल ॲनेक्स,गन्बो पथ,रेसिडेन्सी हॉटेलच्या समोर,डी.एन.रोड छेद रस्ता,फोर्ट,मुंबई-४०० ००१,